## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
### प्राथमिक शिक्षण विभाग

**<u>एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात सहा.शिक्षक व पदवीधर शिक्षक नेमणूक करणेबाबत...</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ कालावधीसाठी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये पात्र उपशिक्षक/पदवीधर शिक्षक यांची एकत्रित मानधन तत्वावर ११ महिने कालावधीसाठी (उन्हाळी व दिवाळी सुट्टी वगळून) तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करणेसाठी **दि.२०/०१/२०२५ ते २४/०१/२०२५ अखेर** सकाळी १० ते सायं.०५ वा. पर्यंत समक्ष अर्ज मागविणेत येत आहे.

**<u>इंग्रजी माध्यमातून</u>** शिक्षण झालेल्या उमेदवारांकरीता आवश्यक पदे – १८

| अ.क्र. | पद | शैक्षणिक अर्हता | विषय | आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सहा. शिक्षक (उपशिक्षक) | एच.एस.सी.(इंग्रजी माध्यम) व डी.एड.(इंग्रजी माध्यम) | - | ११ |
| २ | पदवीधर शिक्षक | बी.ए. (मराठी,इंग्रजी,हिंदी) व डी.एड. (इंग्रजी माध्यम)/बी.एड (इंग्रजी माध्यम) | भाषा विषय | ०२ |
| | | एच.एस.सी-डी.एड./ बी.ए.(समाजशास्त्र) बी.एड. (इंग्रजी माध्यम) | समाजशास्त्र विषय | ०२ |
| | | एच.एस.सी-डी.एड./ बी.एस.सी.(विज्ञान आणि गणित) बी.एड.(इंग्रजी माध्यम) विज्ञान विषय | विज्ञान विषय | ०३ |

टीप- इंग्रजी माध्यमातून डी.एड./बी.एड. उत्तीर्ण पर्याप्त उमेदवार प्राप्त न झाल्यास इतर माध्यमातून डी.एड./बी.एड. उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

### आरक्षणनिहाय पदांचा तपशील-

**१.प्राथमिक पदवीधर शिक्षक एकुण पदे -०७**

| प्रवर्ग | अनु. जाती | अनु.जमाती | विजा अ | भज-ब | भज-क | भज -ड | विमा प्र | इमाव | साशैमा प्र | आ.दु. घ. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षण | १३ % | ७% | ३% | २.५ % | ३.५ % | २ % | २% | १९ % | १०% | १०% | २८ % | १०० % |
| रिक्त पदे | ०१ | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० | ०१ | ०१ | ० | ०२ | ०७ |

**२.उपशिक्षक एकुण पदे -११**

| प्रवर्ग | अनु. जाती | अनु.जमाती | विजा अ | भज-ब | भज-क | भज -ड | विमा प्र | इमाव | साशैमा प्र | आ.दु.घ. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ० | ०१ | ० | ० | ०२ | ०२ | ० | ११ |

<u>अटी व शर्ती-</u>

१) एकत्रित मानधनावर नेमलेल्या शिक्षकांची नेमणूक यांची नेमणुक ही नेमणूक आदेशाचे दिनांकापासून ११ महिने कालावधीसाठी (उन्हाळी व दिवाळी सुट्टी वगळून) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती असेल. आवश्यकतेनुसार ही मुदत दिलेल्या कालावधीपुर्वी केव्हाही संपुष्टात आणण्याचे अधिकार मा.अति.आयुक्त (१) सो. पिं.चिं.मनपा यांचा राहील. त्यानंतर सदरचा कालावधी कोणतीही पुर्वसुचना न देता आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे अर्जदारास कायमपदी नेमणुकीचा हक्क प्राप्त राहणार नाही. तसेच नेमणुकी संदर्भात न्यायालयात दाद मागणार नाही. नियुक्तीच्या वेळी सदरच्या नेमणूकीबाबतचे करारनामा सादर करावा लागेल.

२) उमेदवारांना आपल्या अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, धारण केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता विषयक प्रमाणपत्र, पदवीका, डी.एड, बी.एड. पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक, अनुभव व अनुभवप्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या सत्यप्रती सादर करणे बंधनकारक आहे.

३) ज्या दिवशी प्राथमिक शिक्षण विभागास उपशिक्षक/पदवीधर शिक्षक यांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय सदर उमेदवारांची सेवा संपृष्टात आणण्यात येईल. या संबधीचे सर्व अधिकार मा. अतिरिक्त आयुक्त (१). पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच पात्र उमेदवारांना नेमणुक देताना शिक्षक संख्या कमी/जास्त करण्याचा अधिकार मा.अति.आयुक्त (१) सो.पिं.चिं.मनपा यांचा राहील.

४) उमेदवारांनी सोबत दिलेल्या नमून्यात सहा.शिक्षक व पदवीधर शिक्षक या पदासाठी अर्ज मा.अतिरिक्त आयुक्त (१) पिंपरी चिंचवड मनपा यांचे नावे करावा. सदरचा अर्ज दि. **२०/०१/२०२५ ते २४/०१/२०२५ पर्यंत सकाळी १० ते सायं ०५ वा. पर्यंत <u>समक्ष</u> जुना ड प्रभाग कार्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील, मनपा प्राथमिक शाळा, पिंपरीगाव.** येथे वेळेत सादर करावा. पोस्टाद्वारे/कुरीयरद्वारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

५) सदरची निवड ही सहा.शिक्षक व पदवीधर शिक्षक पदासाठी केवळ तात्पुरत्या एकत्रित मानधनावर हंगामी स्वरूपाची आहे. उमेदवारास मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही. सदरचे पद हे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या करीता व आवश्यकतेनुसार राहील.

६) निवड झालेल्या उमेदवारास एकत्रित मानधना व्यतिरीक्त मनपा मार्फत देण्यात येणाऱ्या कोणत्याही सोयी सुविधा हक्क व इतर आर्थिक लाभ व भत्ते देय राहणार नाहीत. (उदा.दिवाळी बोनस तथा सानुग्रह अनुदान इ.)

७) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर तसेच नियुक्ती झाल्यानंतरही अर्जदार विहित अर्ज/पात्रता धारण न करणारा,गैरवर्तन करताना दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास संबंधिताची उमेदवारी अथवा निवड रद्द करणेत येईल,तसेच काही आक्षेप आढळल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करणेत येईल.

८) उमेदवाराने सोबत दिलेल्या नमुन्यात शिक्षक या पदासाठी अर्ज मा.अति.आयुक्त(१),पिंपरी चिंचवड महानगरपालिका. पिंपरी १८. यांच्या नावाने करावा. विहीत मुदत काळात प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार कोणत्याही परस्थितीत करणेत येणार नाही. अर्जदाराने आपले अर्ज महापालिकेच्या जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील. अन्यथा अर्ज बाद केले जातील.

०९)अपुर्ण माहिती व अटींची पुर्तता न करणा-या उमेदवाराचे अर्ज बाद करून अपात्र ठरविले जातील. अपात्र अर्ज कार्यालयात जमा करणेत येतील. याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१०)तसेच पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक उपलब्ध झाल्यास एकत्रित मानधनावरील नियुक्त्या रद्द करण्याचे अधिकार मा.अति.आयुक्त(१),पिंपरी चिंचवड महानगरपालिका. पिंपरी १८. यांचा राहील.

११) नियुक्तीच्या वेळी उमेदवारास रक्कम रूपये ५००/- स्टॅम्प पेपरवर (नोटराईज्ड करून) मनपा सेवेत भविष्यात नोकरी बाबतचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच न्यायालयात दाद मागणार नाही. याबाबतचा करारनामा सादर करणे बंधनकारक आहे.

सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर (Online) पाहता येईल. जाहिरातीनुसार कार्यवाही करणे अथवा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अंतिम निर्णय मा.अति.आयुक्त (१) सो.पिं.चिं.मनपा यांचा राहील.

सही/-

अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८

जाहिरात क्रमांक -३७९

दिनांक – १४/०१/२०२५

क्र.शिक्षण/१६/कावि/१८८/२०२५